

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – पाचवी (9 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

# दिवस नववा :

CLICK HERE



खालील स्वाध्याय सोडवा.

# २. बंडूची इजार

टेस्ट सोडवा

## स्वाध्याय

**प्र. १. चर्चा करून उत्तरे लिहा.**

(अ) बंडूची इजार लांब झाली म्हणून कापून कमी केली. जर ती आखूड झाली असती, तर ती लांब करण्यासाठी काय करावे लागले असते? शक्य तेवढे सगळे मार्ग सुचवा.

(आ) इजारीची चड्डी झाली, यात चूक कोणाची?

(इ) बंडूच्या इजारीचे पाय चार बोटे कापले, म्हणजे 'पाय' असणारी इजार सजीव आहे, असे आपण म्हणत नाही; पण बोलताना आपण असेच बोलतो. इजारीसारख्या कितीतरी वस्तूंना वेगवेगळ्या अवयवांची नावे वापरतात. त्यांची नावे सांगा.

**प्र. २. खालील वाक्यांमध्ये कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा. त्या वाक्यांचा अर्थ लिहा.**

(कान, नाक, पाय, हात, डोळा, केस, पाठ, पोट, गळा, तोंड)

(अ) चुलीवरच्या तव्याची ................ काळीभोर झाली होती.

(आ) कपाचा ............... तुटला होता, म्हणून दिलावरने चहा ग्लासात ओतला.

(इ) 'हा नारळ नासका निघणार,' नारळाचा ................ बघून धनव्वा म्हणाली.

(ई) मुसळधार पाऊस पडल्यामुळे नदीचे ............... फुगले होते.

(उ) कितीही जोर लावला तरी बाटलीचे ............... उघडेना.

(ऊ) चरवीतले दूध गंजात ओतले, तर ते गंजाच्या ................ पर्यंत आले.

(ए) सुईच्या ................ दोरा ओवून धोंडूमामांनी शिलाई मशीन सुरू केली.

(ऐ) आंब्याच्या कोईचे ............... पांढरे होईपर्यंत गणू कोय चोखत राहिला.

(ओ) आपले शेकडो ............... पसरून उभे असलेले वडाचे झाड वर्षानुवर्षे सगळ्यांना सावली देते.

(औ) खोलीतल्या एकमेव खुर्चीचा ............ मोडला होता, म्हणून मी जमिनीवर बसलो.

• 'भिंतीलाही कान असतात.' ही म्हण आपण वापरतो. 'भिंतीला' कपांप्रमाणे कान नसतात. भिंतीला 'कान' असतात, हे कोणत्या अर्थाने वापरले आहे, ते शिक्षक, पालक यांच्याशी चर्चा करून सांगा.

वरीलप्रमाणे 'त्याच्या पैशाला पाय फुटले,' असेही बोलताना आपण म्हणतो. यासारखी उदाहरणे शोधा. त्यांचा अर्थ माहीत करून घ्या. बोलण्यात त्यांचा वापर करा.

सूचनेनुसार कृती करा.

## 2. संख्याज्ञान

टेस्ट सोडवा

सराव

उदाहरणसंग्रह 4

1. खालील संख्या वाचा व अक्षरांत लिहा.

(1) 25,79,899 (2) 30,70,506 (3) 45,71,504 (4) 21,09,900

(5) 43,07,854 (6) 50,00,000 (7) 60,00,010 (8) 70,00,100

(9) 80,01,000 (10) 90,10,000 (11) 91,00,000 (12) 99,99,999

2. काही जिल्ह्यांतील महिला सहकारी पतपेढ्यांतील ठेवी खाली दिल्या आहेत. त्या संख्या वाचा.

पुणे : ₹ 94,29,408 नाशिक : ₹ 61,07,187 नागपूर : ₹ 46,53,570 अहमदनगर : ₹ 45,43,159

औरंगाबाद : ₹ 37,01,282 यवतमाळ : ₹ 27,72,348 सिंधुदुर्ग : ₹ 58,49,651

### संख्येचे विस्तारित रूप व अंकांची स्थानिक किंमत

**ताई** : 27,65,043 या संख्येतील प्रत्येक अंकाची स्थानिक किंमत पाहा.

| अंक | 2 | 7 | 6 | 5 | 0 | 4 | 3 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थान | दशलक्ष | लक्ष | दशहजार | हजार | शतक | दशक | एकक |
| अंकाची स्थानिक किंमत | 20,00,000 | 7,00,000 | 60,000 | 5,000 | 0 | 40 | 3 |

**हमीद** : अंकांच्या स्थानिक किमती बेरजेच्या रूपात लिहिल्या, की संख्येचे विस्तारित रूप मिळते.
27,65,043 या संख्येचे विस्तारित रूप
20,00,000 + 7,00,000 + 60,000 + 5,000 + 0 + 40 + 3 हे येते.

**ताई** : आता 95,04,506 चे विस्तारित रूप काय येईल सांगा बरं !

**सोनी** : 90,00,000 + 5,00,000 + 0 + 4,000 + 500 + 0 + 6 असे विस्तारित रूप येईल.

**ताई** : शाबास ! हेच विस्तारित रूप 90,00,000 + 5,00,000 + 4,000 + 500 + 6 असेही लिहिता येईल. हे पाहा मी आता विस्तारित रूप देते त्यावरून संख्या लिहा.
4,00,000 + 90,000 + 200

**आशा** : येथे संख्येच्या लक्षस्थानी 4, दशहजारस्थानी 9, हजारस्थानी काही नाही म्हणून 0, शतकस्थानी 2, दशक व एककस्थानी काही नाही म्हणून 0 लिहू, म्हणून ती संख्या 4,90,200 आहे.

**ताई** : <u>5</u>9,30,478 या संख्येत अधोरेखित अंकाची स्थानिक किंमत सांगा.

**सोनी** : येथे अधोरेखित अंक 5 आहे. हा अंक दशलक्षस्थानी आहे, म्हणून त्याची स्थानिक किंमत 5 दशलक्ष म्हणजेच 50 लक्ष.

Follow the instructions.

## 2. Number Work

**Revision**

### Problem Set 4

**1.** Read the numbers and write them in words.

(1) 25,79,899 (2) 30,70,506 (3) 45,71,504 (4) 21,09,900
(5) 43,07,854 (6) 50,00,000 (7) 60,00,010 (8) 70,00,100
(9) 80,01,000 (10) 90,10,000 (11) 91,00,000 (12) 99,99,999

**2.** Given below are the deposits made in the Women's Co-operative Credit Societies of some districts. Read those figures.

Pune : ₹ 94,29,408 Nashik : ₹ 61,07,187 Nagpur : ₹ 46,53,570
Ahmadnagar : ₹ 45,43,159 Aurangabad : ₹ 37,01,282 Yavatmal : ₹ 27,72,348
Sindhudurg : ₹ 58,49,651

### The expanded form of a number and the place value of digits

**Teacher :** Look at the place value of each of the digits in the number 27,65, 043.

| **Digit** | 2 | 7 | 6 | 5 | 0 | 4 | 3 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Place** | Ten Lakhs | Lakhs | Ten Thousands | Thousands | Hundreds | Tens | Units |
| **Place Value** | 20,00,000 | 7,00,000 | 60,000 | 5,000 | 0 | 40 | 3 |

**Hamid** : When we write the place values of the digits as an addition, we get the expanded form of the number. So, the expanded form of the number 27,65,043 is 20,00,000 + 7,00,000 + 60,000 + 5,000 + 0 + 40 +3.

**Teacher** : Now tell me the expanded form of 95,04,506.

**Soni** : 90,00,000 + 5,00,000 + 0 + 4,000 + 500 + 0 + 6.

**Teacher** : Good! It can also be written as 90,00,000 + 5,00,000 + 4,000 + 500 + 6. Now write the number from the expanded form that I give you.
4,00,000 + 90,000 + 200

**Asha** : Here, we have 4 in the lakhs place, 9 in the ten thousands place and 2 in the hundreds place. There are no digits in the ten thousands place and in the tens and units places. Hence, we write 0 in those places. Therefore, the number is 4,90,200.


**Teacher** : Tell me the place value of the underlined digit in the number <u>5</u>9,30,478.

**Soni** : The underlined digit is 5. The digit is in the ten lakhs place. Hence, its place value is 50,00,000 or fifty lakhs.

टेस्ट सोडवा

- look , listen and enact.

**Revision**




1. Listen carefully and note down in figures, the four numbers in the story.

लक्षपूर्वक ऐका आणि गोष्टीत येणाऱ्या चार संख्या (इंग्रजी) अंकांत लिहा. 02

## The Golden Feather



One day, the Queen was taking a walk
in her garden, when she found
a big, beautiful golden feather.



Then she met a little man. He said,
"If you give me that feather,
I will give you three big diamonds."
"Sorry!" said the Queen.



Then she met an old woman. The old woman said,
"If you give me that feather,
I will give you a necklace of twenty-one pearls."
"Sorry!" said the Queen.



Then she met the King. The King said,
"If you give me that feather,
I will give you ninety-nine gold coins."
"Sorry!" said the Queen.



Then she met the little prince. He said,
"Oh, Mamma! What a bright beautiful feather!"
"Take it, my dear," said the Queen. "Keep it safe."

2. Listen to the story again and note down the words that begin with 'w'.

गोष्ट पुन्हा ऐका आणि त्यातील 'w' ने सुरू होणारे शब्द लिहा. 02

> **1. व 2.** या कृती लक्षपूर्वक ऐकण्यासाठी आहेत. गोष्ट ऐकताना मुलांना पुस्तके बंद ठेवायला सांगावे. काही काळाने गोष्ट पुन्हा ऐकवून 'w' ऐवजी इतर अक्षरांनी – उदा., q, k, i – सुरू होणारे शब्द लिहिण्यास सांगता येईल.

# २. पृथ्वीचे फिरणे


टेस्ट सोडवा

पाठ वाचा व समजून घ्या.

**करून पहा.**

एका मोठ्या टेबलावर मधोमध एक मेणबत्ती उभी ठेवा. मेणबत्तीभोवती एक मोठे वर्तुळ काढा. या वर्तुळाच्या एका बिंदूवर पृथ्वीगोल ठेवा. मेणबत्ती पेटवा. खोलीत अंधार करा. मेणबत्ती म्हणजे सूर्य आहे असे समजा.

पृथ्वीगोलाच्या कोणत्या भागावर उजेड पडतो, कोणत्या भागावर उजेड पडत नाही ते पहा.




पृथ्वीगोलाकडे उत्तर ध्रुवाकडून पहा आणि घड्याळाच्या काट्यांच्या विरुद्ध दिशेने फिरवा. आपली पृथ्वी ही स्वत:भोवती याच दिशेने म्हणजे पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. पृथ्वीगोलाचे विविध भाग क्रमाक्रमाने उजेडात येतात आणि त्याच क्रमाने उजेडापासून दूर जातात. ज्या भागावर उजेड पडतो तेथे दिन आहे, तर जेथे उजेड पडत नाही तेथे रात्र आहे, असे आपण म्हणतो.

## सूर्योदय आणि सूर्यास्त

**करून पहा.**

एक लाल रंगाची टिकली घ्या. ती पृथ्वीगोलावर चिकटवा. वरील प्रयोगाप्रमाणेच पृथ्वीगोल व मेणबत्ती घेऊन प्रयोग करा.

पृथ्वीगोल घड्याळाच्या काट्यांच्या विरुद्ध दिशेनेच फिरवा. लाल टिकलीवर पृथ्वीगोलाच्या कोणत्या स्थितीत सूर्योदय, मध्यान्ह आणि सूर्यास्त होईल याचे निरीक्षण करा.



पृथ्वीगोलावरील दिन व रात्र

लाल टिकलीवर एकदा सूर्योदय झाल्यानंतर पुन्हा सूर्योदय केव्हा होतो ते पहा. जेव्हा पृथ्वीची स्वत:भोवतीची एक फेरी, म्हणजेच एक परिवलन पूर्ण झालेले असते, तेव्हा लाल टिकलीवर पुन्हा सूर्योदय होतो. हे तुमच्या लक्षात येईल.

पृथ्वीच्या एका परिवलनाच्या या कालावधीला आपण एक दिवस म्हणतो. एका दिवसाचे एक दिन आणि एक रात्र असे भाग असतात. कालमापनासाठी एका दिवसाच्या कालावधीचे आपण २४ समान भाग करून प्रत्येक भागाला १ तास म्हणतो.

## वर्ष

**करून पहा.**

पृथ्वीगोल टेबलावरील वर्तुळावरून पुढे सरकवा. असे करताना पृथ्वीचा गोल सतत फिरता ठेवा आणि अक्षाची दिशा बदलणार नाही याची काळजी घ्या.


वर्तुळावरून पुढे सरकत शेवटी पृथ्वीगोल पुन्हा सुरुवातीच्या जागी पोहोचेल. याचप्रमाणे पृथ्वीही स्वत:भोवती फिरत फिरत सूर्याभोवती 'परिभ्रमण' करत असते. पृथ्वीच्या सूर्याभोवतीच्या एका परिभ्रमणाला जो कालावधी लागतो त्याला 'वर्ष' म्हणतात. एका वर्षात सुमारे ३६५ दिवस आणि ६ तास असतात.

पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा.

## १. इतिहास म्हणजे काय ?

टेस्ट सोडवा

**४. संकल्पनाचित्र तयार करा.**




**५. पुढील तक्त्यात इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण करा.**

**इतिहासाची साधने** – नाणी, पत्रव्यवहार, किल्ले, जात्यावरील ओव्या, भांडी, ताम्रपट, वाडे, शिलालेख, लोकगीते, स्तंभ, चरित्रग्रंथ, लेणी, लोककथा.

| भौतिक | लिखित | मौखिक |
|---|---|---|
| | | |

**उपक्रम**

(अ) तुमच्या गावातील / परिसरातील ऐतिहासिक वास्तूंची आणि प्राचीन धार्मिक स्थळांची माहिती व चित्रे संकलित करा.

(आ) तुमच्या शाळेचा इतिहास जाणून घेण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या साधनांचा वापर कराल, याची यादी तयार करा व साधनांवरून तुम्हांस कोणती माहिती मिळू शकेल ते लिहा.

जसे – शाळेची कोनशिला :- शाळेची स्थापना, उद्‌घाटक इत्यादी.

**हे तुम्हांला माहीत आहे का ?**

### पुरातत्त्व

विविध मानवी समाजांनी भूतकाळात निर्माण केलेल्या अनेक वस्तू आणि वास्तू यांचे अवशेष ठिकठिकाणी पहायला मिळतात. त्यांतील सर्वच जमिनीवर असतात असे नाही. वर्षानुवर्षे पुराने वाहून आणलेल्या गाळाचे किंवा वाऱ्याने वाहून आणलेल्या मातीचे थर साचून त्याखाली काही अवशेष गाडले जातात. मानवाने घडवलेल्या वस्तू आणि वास्तू यांच्याप्रमाणेच मानव आणि प्राणी यांच्या सांगाड्यांचे अवशेषही अशाच पद्धतीने गाडले गेलेले असतात. अशा अवशेषांना पुरावशेष म्हणतात. 'पुरा' म्हणजे जुने.

भूतकाळातील वस्तू आणि वास्तू यांच्या तसेच त्यांच्या अवशेषांच्या आधारे, घडून गेलेल्या घटनांची मांडणी शास्त्रीय पद्धतीने करणाऱ्या शास्त्रास 'पुरातत्त्व शास्त्र' असे म्हणतात. पुरावशेष शोधून काढण्याचे आणि त्यांचा अभ्यास करण्याचे काम पुरातत्त्वज्ञ करतात. जमिनीखाली गाडले गेलेले पुरावशेष उजेडात आणण्यासाठी जमिनीचा एकेक थर अत्यंत शास्त्रशुद्ध रीतीने तपासत, काळजीपूर्वक रीतीने खणण्याला 'पुरातत्त्वीय उत्खनन' असे म्हणतात. पुरावशेष जिथे सापडू शकतील, अशा स्थळांचा शोध प्रथम घेतला जातो. त्यांची व्यवस्थित नोंद केली जाते. त्यानंतर कोणत्या स्थळी उत्खनन करायचे याचे नियोजन केले जाते.

उत्खननात सापडलेल्या अवशेषांचा अभ्यास करत असताना पुरातत्त्वज्ञ अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ,

१. मिळालेले अवशेष कोणत्या काळातील आहेत ?
२. ते अवशेष कोणत्या संस्कृतीचे आहेत ?
३. त्या संस्कृतीमधील लोकांचे दैनंदिन जीवन कशा प्रकारचे होते ?
४. त्या लोकांचे इतर संस्कृतींमधील लोकांशी कशा प्रकारचे संबंध होते ?
५. त्या लोकांच्या दैनंदिन जीवनातील गरजा भागवण्यासाठी ते भोवतालच्या परिसरातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग कसा करून घेत होते ?

● सुनो और गाओ :

# रियाज करो |

व्हिडिओ पहा

टेस्ट सोडवा





## २. बूँदें



रिमझिम-रिमझिम गातीं बूँदें,
धरती पर हैं आतीं बूँदें ।

खेतों, बागों, मैदानों में,
हरियाली फैलातीं बूँदें ।

धरती से नालों, नदियों में,
सागर में मिल जातीं बूँदें ।

गरमी से तपते लोगों को,
शीतलता पहुँचातीं बूँदें ।

मेंढक, मोर, पपीहे, कोयल,
सबका मन हरषातीं बूँदें ।

पुरवाई के रथ पर चढ़कर,
इठलातीं, मुसकातीं बूँदें ।

*– रोहिताश्व अस्थाना*



१. कविता में आए हुए लयात्मक शब्दों को ढूँढ़कर सुनाओ ।
२. बूँदें क्या-क्या करती हैं, बताओ ।

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| पाचवी मराठी | पाचवी गणित | सेमी गणित | पाचवी इंग्रजी | पाचवी प.अ-1 | पाचवी प.अ-2 | हिंदी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे

वेब स्त्रोत-'ई-बालभारती'

सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in